ePaper
वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827
महाईन्यूज™
WWW.MAHAENEWS.COM | सोमवार, दि. 27 जुलै 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## “अभिजीत कधीच राजकारणात जाणार नाही”, दिपकेंच्या वडिलांचं ठाम मत





पान 3 वरुन...

चंद्रंग ट्रस्टच्या ‘आरोग्य वारी’मधून वारकऱ्यांची सेवा!

### भाजपाची शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी; आप सरकारने आरोप फेटाळले

# पंजाबमध्येही पेपरफुटीचा वाद!

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**नीट पेपरफुटी प्रकरणी ३६ दिवस आंदोलन केल्यानंतर शनिवारी अखेर धर्मेंद्र प्रधान यांनी शिक्षण मंत्रीपदाचा राजीनामा दिला. प्रधान यांच्या राजीनाम्याचे प्रकरण ताजे असताना आता पंजाबमध्ये राजकारण तापले आहे. पेपरफुटी प्रकरणावरुन भाजपाने पंजबाचे शिक्षण मंत्री हरजोत सिंग बैन्स यांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे. विविध परीक्षांचे पेपर फुटल्याचा दावा भाजपाने केला आहे. राज्याचे मुख्यमंत्री भगवंत सिंग मान यांनी मात्र पेपरफुटीचे आरोप फेटाळून लावले आहेत.**

“पंजाबचे शिक्षणमंत्री राजीनामा कधी देणार? अरविंद केजरीवाल नैतिकतेच्या आधारावर पंजाबच्या शिक्षणमंत्र्यांचा राजीनामा कधी मागणार?” असा प्रश्न भाजपाचे प्रवक्ते प्रदीप भंडारी यांनी विचारला. भंडारी यांनी पीएसईबी इयत्ता १२ वी इंग्रजी बोर्ड परीक्षा, पंजाब राज्य शिक्षक पात्रता चाचणी (पीएसटीईटी) आणि कृषी विकास अधिकारी (एडीओ) परीक्षेत पेपरफुटी झाल्याचा आरोप केला आहे.

भंडारी यांनी पंजाब सेवा निवड मंडळ (पीएसएसएसबी) गट-ब आणि संयुक्त भरतीमध्ये अनियमितता झाल्याचाही आरोप केला. नायब तहसीलदार आणि फार्मसी ऑफिसर भरती परीक्षांमध्ये मोठ्या प्रमाणावर घोटाळा झाल्याचा आरोपही त्यांनी केला. तसेच उत्पादन शुल्क आणि कर तपासणी गुणवत्ता यादीत बनावट नावे आढळल्याचा आरोपही भंडारी यांनी केला आहे.

### काँग्रेसचाही आरोप

पंजाब काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष अमरिंदर सिंग राजा यांनीही गेल्या चार वर्षांत सहा मोठ्या पेपरफुटी झाल्याचा आरोप केला आहे. “पंजाबचे शिक्षणमंत्री हरजोत बैन्स राजीनामा कधी देणार? चार वर्षे झाली. ६ मोठ्या परीक्षेत पेपरफुटी झाली. असंख्य स्वप्ने उद्ध्वस्त झाली. तरीही कोणी जबाबदारी घेतली नाही. पंजाबच्या विद्यार्थ्यांना उत्तरे हवी आहेत,” असे सिंग म्हणाले. दरम्यान, आम आदमी पक्षाने हे आरोप फेटाळले आहेत.

### आपने आरोप फेटाळले

मुख्यमंत्री भगवंत मान यांनी गेल्या साडेचार वर्षांत पेपरफुटी झाली नसल्याचे त्यांनी सांगितले. दरम्यान, दोन ठिकाणी परीक्षेदरम्यान कॉपीचे प्रयत्न झाल्याते त्यांनी मान्य केले. “आम्हाला दोन ठिकाणांहून कॉपीच्या तक्रारी मिळाल्या, पण पंजाबमध्ये एकही पेपरफुटी झाली नाही. आम्ही कॉपीच्या गैरप्रकारावर १० मिनिटांत कारवाई केली”, असे मान म्हणाले. आप नेते बलतेज पन्नू यांनी देखील पेपरफुटीचे आरोप फेटाळून लावले.



# ‘बीएलए’ नियुक्तीतही महायुतीची ‘आघाडी’

## ‘एसआयआर’ प्रक्रियेत जिल्ह्यात युतीकडून १७ हजार, तर आघाडीकडून ७ हजार जणांची नियुक्ती

**महाईन्यूज । पुणे**

**जिल्ह्यात राबविण्यात येणाऱ्या विशेष सखोल पुनरीक्षण मोहिमेत (एसआयआर) सर्व मतदारांची नोंद मतदारयादीमध्ये व्हावी, यासाठी प्रशासनाला सहकार्य करण्यामध्ये महायुतीनेच आघाडी घेतली आहे. प्रशासनाच्या सहकार्यासाठी महायुतीने १७ हजार, तर महाविकास आघाडीने ७,८८४ मतदान केंद्रस्तरीय प्रतिनिधींची (बीएलए) नियुक्ती केली आहे. महायुतीमध्ये भाजपनेच नियुक्त केलेल्या ‘बीएलए’ची संख्या सर्वाधिक ७,८०६ इतकी आहे.**



‘एसआयआर’च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी मतदारयादी त्रुटीमुक्त आणि अचूक तयार करण्याला प्राधान्य देण्यात आले आहे. त्यानुसार येत्या ८ ऑगस्टपर्यंत केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) घरोघरी जाऊन मतदार पडताळणी करणार आहेत. जिल्ह्यातील ९० लाख ८० हजार १७३ मतदारांच्या नोंदीची प्रत्यक्ष पडताळणी करण्यात येणार असून, त्यासाठी जिल्ह्यात ८ हजार ४१७ मतदान केंद्रांवर विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. त्यासाठी प्रत्येक मतदान केंद्रांवर केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांची (बीएलओ) नियुक्ती करण्यात आली असून, विविध राजकीय पक्षांच्या मतदान केंद्रस्तरीय प्रतिनिधींची (बीएलए) नियुक्ती करण्याचे आवाहन निवडणूक विभागाकडून करण्यात आले आहे. मात्र, त्यामध्ये राजकीय पक्षांची उदासीनता जिल्हा प्रशासनाच्या निवडणूक शाखेकडील आकडेवारीवरून स्पष्ट झाली आहे.

### ग्रामीण भागाची आघाडी

‘एसआयआर’मध्ये जिल्ह्याच्या ग्रामीण भागाने आघाडी घेतली आहे. त्या तुलनेत शहरी भागात हे प्रमाण कमी आहे. शहरी भागातील मतदारांचे पत्ते अचूक नसल्यामुळे त्यांच्यापर्यंत पोहोचण्यात अडचणी येत असल्याचे जिल्हा प्रशासनाकडून सांगण्यात आले. त्याउलट, ग्रामीण भागातील मतदारांचे पत्ते कायम असल्यामुळे या मोहिमेला ग्रामीण भागात गती मिळाली आहे.

राजकीय पक्षांकडून जिल्हा प्रशासनाला २४ ८८४ ‘बीएलए’ देण्यात आले आहेत. त्यामध्ये भारतीय जनता पक्षाने सर्वाधिक ७ हजार ८०६ जणांची नियुक्ती केली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसकडून (अजित पवार) ५ हजार ६६७, तर शिवसेना (शिंदे) ३ हजार ५२७ जणांची नियुक्ती करण्यात आली आहे. महायुतीमधील या तिन्ही पक्षांनी मिळून १७ हजार नोंदणी केल्याचे दिसून येत आहे. तर महाविकास आघाडीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसकडून (शरद पवार) २ हजार ९५७, शिवसेना (उद्धव ठाकरे) आणि काँग्रेसकडून अनुक्रमे २ हजार ४४५ आणि २ हजार १७३ जणांची नियुक्ती केली आहे. मनसेकडून अवघ्या ३२९ जणांची नियुक्ती करण्यात आली आहे.

जिल्हा निवडणूक शाखेकडून काही ‘बीएलओं’वर गुन्हे दाखल झाले असले, तरी त्या बाबत निवडणूक शाखेकडून सावध भूमिका घेण्यात आली आहे. गुन्हा दाखल झालेल्या ‘बीएलओं’ची चौकशी करण्यासंदर्भातील पत्र संस्था चालकांना देणे आवश्यक आहे. मात्र, तसे पत्र अद्यापही देण्यात आले नसल्याचे सांगण्यात आले.

### चार जणांवर गुन्हे

शासकीय काम नाकारणाऱ्या चार ‘बीएलओं’वर जिल्हा प्रशासनाकडून गुन्हे दाखल करण्यात आले आहे. वडगावशेरी आणि पुणे कॅन्टोन्मेंट मतदारसंघातील हे बीएलओ आहेत. हा गुन्हा सिद्ध झाल्यास त्यांना किमान तीन महिन्यांपासून दोन वर्षांपर्यंत कारावासाची शिक्षेची कायद्यात तरतूद आहे.

# शहरातील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी महापालिकेचे मोठे पाऊल!

**महाईन्यूज । पुणे**

**शहरातील विविध भागातील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी महापालिका प्रशासनाने रखडलेल्या रस्त्यांच्या मिसिंग लिंक जोडण्याचे काम पुन्हा सुरु केले जाणार आहे. या वर्षी शहरातील १२ मिसिंग लिंकची कामे पूर्ण केली जाणार असल्याचे महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी सांगितले.**



शहरातील अनेक महत्वाच्या भागातील मिसिंग लिंकची कामे रखडली आहेत. वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी मिसिंग लिंक जोडल्यास त्याचा मोठा फायदा होणार असून यामुळे वाहनचालकांना वेळ वाचणार असून वाहतूक कोंडी देखील सुटणार आहे. यंदाच्या वर्षी प्राधान्यक्रमाणे १२ मिसिंग लिंकची कामे पूर्ण केली जाणार असून यासाठी महापालिकेच्या अर्थसंकल्पात निधीची विशेष तरतूद करण्यात आली आहे. ही कामे पुढील काही दिवसांत सुरु होणार असल्याचे महापालिका आयुक्त राम यांनी सांगितले.

पुणे महापालिकेच्या विकास आराखडा (डिपी) तसेच महापालिका हद्दीमध्ये समावेश झालेल्या नवीन गावांचा प्रादेशिक विकास आराखडा (आरपी) डोळ्यासमोर ठेवून महापालिकेने ऑगस्ट २०२२ मध्ये शहरातील रस्त्यांची पाहणी केली होती. यामध्ये भूसंपादन व इतर कारणांमुळे मोठ्या संख्येने रस्ते रखडल्याचे समोर आले होते. हे रस्ते जोडल्यानंतर वाहतूक कोंडी सुटणार असल्याचे लक्षात आल्यानंतर महापालिकेच्या पथ विभागाने शहरातील मिसिंग लिंक जोडण्याचा निर्णय घेतला.

याचा प्रकल्प आराखडा तयार करण्यासाठी महापालिकेने सल्लागार कंपनी नियुक्ती केली. या कंपनीने मुख्य शहरासह समाविष्ट गावांचा सर्व्हे करून शहरात ७०० मिसिंग लिंक असल्याचे व त्याचे एकूण अंतर ५२० किलोमीटर असल्याचा अहवाल सादर केला. त्यानंतर महापालिकेने त्याची कामे हाती घेतली. शहराच्या वाहतुकीवर परिणामकारक प्रभाव टाकणाऱ्या ३३ मिसिंग लिंक जोडण्याचा निर्णय पथ विभागाने घेतला आहे.

यासाठी सक्तीचे भूसंपादन देखील केले जाणार आहे. या सर्व मिसिंग लिंकची एकूण लांबी १२ किलोमीटर असून या लिंक जोडल्यानंतर सुमारे ६० किलोमीटर लांबीचे रस्ते वापरात येणार असल्याचा दावा करण्यात आला आहे.

गेल्या दीड वर्षांपासून पथ विभागाने सुरु केलेली मिसिंग लिंक जोडण्याची प्रक्रिया थंडावली आहे. कोथरूड मतदार संघातील मिसिंग लिंक जोडण्याचे काम महापालिकेने आतापर्यंत पूर्ण केले आहे. उर्वरित शहरातील मिसिंग लिंक जोडण्याचे काम कधी पूर्ण होणार अशी विचारणा नागरिकांकडून केली जात होती. याबाबत महापालिका आयुक्त राम यांना विचारले असता, ते म्हणाले, मिसिंग लिंक जोडण्याचे काम हाती घेतले जाणार आहे.

महापालिकेने यंदाच्या वर्षीच्या अर्थसंकल्पात मिसिंग लिंक जोडण्यासाठी स्वतंत्र तरतूद ठेवली आहे. पथ विभागाने जाहिर केलेल्या ३३ मिसिंग लिंकपैकी १२ मिसिंग लिंक वर्षभरात जोडण्यात येणार आहे. त्यासाठी पथ विभागाला आवश्यक त्या सूचना देखील दिल्याचे आयुक्त राम यांनी सांगितले.

# चंद्ररंग ट्रस्टच्या 'आरोग्य वारी'मधून लाखो वारकऱ्यांची सेवा!

## वारकऱ्यांच्या आरोग्यासाठी 'चंद्ररंग चॅरिटेबल ट्रस्ट'कडून सलग ६ व्या वर्षी अविरत सेवा

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**आषाढी वारीच्या भक्तिमय वातावरणात विठूरायाच्या दर्शनासाठी निघालेल्या वारकऱ्यांची पावले पंढरीच्या दिशेने पडत असताना, त्यांच्या आरोग्याची काळजी घेत दरवर्षीप्रमाणे यंदाही 'चंद्ररंग चॅरिटेबल ट्रस्ट"ची आरोग्य वारी' वारकऱ्यांच्या आरोग्य सेवेत रुजू झाली. लोकनेते दिवंगत आमदार लक्ष्मणभाऊ जगताप, आमदार शंकरभाऊ जगताप मित्र परिवार, चंद्ररंग चॅरिटेबल ट्रस्ट आणि आर्ट ऑफ लिविंग यांच्या संयुक्त विद्यमाने यंदा ही सेवा रुजू करण्यात आली. या आरोग्य वारीच्या माध्यमातून लाखो वारकऱ्यांना पालखी मार्गात आरोग्यसेवा देण्यात आल्या.**




'चंद्ररंग चॅरिटेबल ट्रस्ट'' च्या पुढाकारातून दरवर्षी देहू आणि आळंदी या दोन्ही पवित्र तीर्थक्षेत्रांतून या आरोग्य वारीचा प्रारंभ होतो. पालखी प्रस्थान झाल्यापासून थेट पंढरपूरपर्यंत ही आरोग्य सेवा वारकऱ्यांच्या सोबत चालत राहते . यामध्ये सुसज्ज व्हॅन त्यासोबतच पॅरामेडिकल स्टाफ, अनुभवी डॉक्टर्स आणि सर्व प्रकारची आवश्यक औषधे घेऊन वैद्यकीय पथके पालखी मार्गावर मार्गक्रमण करतात. वारीच्या दरम्यान वारकऱ्यांना उद्भवणाऱ्या किरकोळ व गंभीर आजारांवर त्वरित उपचार मिळवून देणे, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे.

स्व. लोकनेते लक्ष्मण भाऊ जगताप यांनी नेहमीच आरोग्य सेवेला प्राधान्य दिले. त्यांच्याच प्रेरणेतून आरोग्यवारीची संकल्पना पुढे आली. गोसेवक, प्रसिद्ध उद्योजक विजू शेठ जगताप यांच्या माध्यमातून पालखी मार्गातील या आरोग्य सेवेला बळ मिळाले. आमदार शंकर जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली यंदा सलग 6 व्या वर्षी पालखी मार्गात चंद्ररंग चॅरिटेबल ट्रस्टच्या वारीने आपली सेवा वारकऱ्यांच्या चरणी रुजू केली. दिवसभर चालणाऱ्या वारकऱ्यांच्या पायांना येणारे फोड, सूज आणि शारीरिक थकवा दूर करण्यासाठी आरोग्य वारीत विशेष व्यवस्था करण्यात आली. पालखी मार्गावर वारकऱ्यांच्या पायांची तपासणी करून त्यांच्या पायांना कास्यथाळी मशीनद्वारे मालिश (मसाज) करून दिली गेली. वारकऱ्यांच्या पायांची मालिश करण्यासाठी साधारण दीड हजाराहून अधिक मशीन कार्यरत होत्या. लोकनेते स्व. आमदार लक्ष्मणभाऊ जगताप पॅरामेडिकलचे विद्यार्थी आणि आर्ट ऑफ लिविंगच्या साधकांनी अत्यंत आपुलकीने आणि श्रद्धेने वारकऱ्यांना ही आरोग्य सेवा दिली. कडक ऊन, पाऊस किंवा शारीरिक थकवा यामुळे त्रस्त असलेल्या वारकऱ्यांना या मायेच्या सेवेमुळे अतिशय मोठा दिलासा मिळाला.

लाखोंच्या संख्येने असणाऱ्या वारी सोहळ्यात गर्दीमुळे किंवा अचानक उद्भवणाऱ्या आरोग्याच्या समस्यांमुळे काही अनुचित घटना घडल्यास, हे वैद्यकीय पथक त्वरित धावून जाते. प्रथमोपचार आणि आवश्यक ते तातडीचे उपचार वेळेत उपलब्ध करून दिल्यामुळे अनेक वारकऱ्यांना तातडीने मदत मिळते आणि त्यांना पुढील प्रवासासाठी मोठी ऊर्जा मिळते. पालखी मार्गावरील ही आरोग्य यंत्रणा वारकऱ्यांसाठी अत्यंत महत्त्वाची ठरत आहे. या आरोग्य वारीने लाखो वारकऱ्यांच्या चरणी आपली सेवा रुजू केली आहे.

### वारकऱ्यांसाठी खऱ्या अर्थाने आधारवड!

या अनोख्या आणि पवित्र संकल्पनेचे मुख्य शिल्पकार ज्येष्ठ गोसेवक व प्रसिद्ध बांधकाम व्यावसायिक उद्योजक विजुशेठ जगताप हे आहेत. वारकऱ्यांच्या निस्सीम भक्तीची आणि शारीरिक कष्टांची जाणीव ठेवून त्यांनी सहा वर्षांपूर्वी या उपक्रमाची पायाभरणी केली. आज चिंचवड विधानसभेचे आमदार शंकर जगताप यांच्या सक्षम मार्गदर्शनाखाली आणि चंद्ररंग चॅरिटेबल ट्रस्टच्या अहोरात्र परिश्रमांतून ही आरोग्य वारी अतिशय नियोजनबद्ध पद्धतीने आणि अखंडपणे सुरू आहे.'ज्ञानोबा-तुकाराम' आणि 'विठ्ठल विठ्ठल'च्या जयघोषात चालणाऱ्या वारकऱ्यांची सेवा हीच खरी ईश्वरसेवा मानून राबवला जाणारा हा उपक्रम संपूर्ण पालखी सोहळ्यात वारकऱ्यांसाठी खऱ्या अर्थाने आधारवड ठरत आहे.

# डॉ पी डी पाटील कुलपती यांना शिक्षण महर्षी पुरस्कार प्रदान!

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**आषाढी एकादशीच्या पावन पर्वानिमित्त राष्ट्रीय श्रमिक आघाडीच्या वतीने आचार्य अत्रे रंगमंदिर पिंपरी येथे(दि.२५) आयोजित दिंडी व कामगार वारकरी मेळाव्यात डी. वाय. पाटील समूहाचे प्रमुख कुलपती डॉ पी. डी. पाटील यांचा "शिक्षणमहर्षी" या सन्मानाने गौरव करण्यात आला. या सोहळ्यास चिंचवडचे आमदार शंकरराव जगताप, माजी राज्यसभा खासदार अमर साबळे, विधान परिषद सदस्या उमाताई खापरे, भाजपचे शहर प्रभारी भरत नाना पाटील, प्राधिकरणचे माजी अध्यक्ष सदाशिव खाडे यांच्यासह अनेक मान्यवर, वारकरी आणि श्रमिक हजारोच्या संख्येने उपस्थित होते.**




यशवंतभाऊ भोसले यांनी पी. डी. पाटील यांच्या चार दशकांहून अधिक काळातील शैक्षणिक योगदानाचा गौरव करत, "हा पुरस्कार कोणत्याही शासनाचा नाही, तर समाजाचा आहे. त्यामुळे आजपासून पी. डी. पाटील हे खऱ्या अर्थाने 'शिक्षणमहर्षी' आहेत," अशी घोषणा केली. डी. वाय. पाटील संस्थेमुळे हजारो सर्वसामान्य, कामगार आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबातील विद्यार्थी डॉक्टर, अभियंते, आयटी तज्ज्ञ होऊन देश-विदेशात यशस्वी झाले असल्याचे त्यांनी नमूद केले.भोसले यांनी सोशल मीडियातील पत्रकारांसाठी डी. वाय. पाटील संस्थेत प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरू करण्याची तसेच पत्रकारांसाठी आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्याची विनंतीही यावेळी केली.

सत्काराला उत्तर देताना डॉ पी. डी. पाटील यांनी हा सन्मान आपल्यासाठी अत्यंत भावनिक असल्याचे सांगितले. "मी गेली ४५ वर्षे पिंपरी-चिंचवडमध्ये शिक्षण क्षेत्रात काम करत आहे. पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील यांच्या मार्गदर्शनातून या संस्थेचा विस्तार करण्याची संधी मिळाली. आज जागतिक स्तरावर मान्यता मिळालेल्या संस्थेचा भाग असल्याचा अभिमान वाटतो. हा सन्मान माझ्यासाठी प्रेरणादायी असून याचे श्रेय माझ्या सहकाऱ्यांना आणि समाजाला आहे. शिक्षण महर्षी पुरस्कार दिल्याबद्दल कामगार नेते यशवंतभाऊ भोसले तसेच राष्ट्रीय श्रमिक आघाडीचा आभारी आहे, असे ते म्हणाले.

आमदार शंकरराव जगताप यांनी पी. डी. पाटील यांच्या कार्याचा गौरव करताना सांगितले की, "पिंपरी-चिंचवडची ओळख जगभर पोहोचविण्यात डी. वाय. पाटील संस्थेचे मोलाचे योगदान आहे. सर्वसामान्य कुटुंबातील विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून देत त्यांनी अनेकांचे जीवन घडविले आहे. माझ्या कुटुंबातील सदस्यालाही त्यांच्या माध्यमातून शिक्षणाची संधी मिळाली आणि आज तो यशस्वी उद्योजग आहे."राष्ट्रीय श्रमिक आघाडीने सुरू केलेल्या दिंडी उपक्रमाचे कौतुक करत, "श्रमिक आणि वारकरी यांचा सुंदर संगम घडवून आणण्याचे कार्य यशवंतभाऊ भोसले करत आहेत. हा उपक्रम पुढील अनेक वर्षे सुरू राहावा," अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

माजी राज्यसभा खासदार अमर साबळे यांनी आपल्या भाषणात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या "शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे" या विचाराचा उल्लेख करत, "पी. डी. पाटील यांनी शिक्षणाची पंढरी उभी करून हजारो विद्यार्थ्यांचे आयुष्य घडविले आहे. त्यांनी अनेक पिढ्या घडवल्या असून हीच खरी राष्ट्रसेवा आहे. यशवंतभाऊ भोसले यांनी"श्रमिकांच्या सेवेसाठी आयुष्य वाहिले आहे. निष्काम कर्मयोगाच्या भावनेतून ते सातत्याने समाजकार्य करत असून अशा व्यक्तींच्या माध्यमातून समाजात सकारात्मक परिवर्तन घडत आहे."



## भूमिका

# समस्या महागड्या उच्च शिक्षणाची



**भारतात उच्च शिक्षणाचा खर्च झपाट्याने वाढत असून तो विद्यार्थी, पालक आणि देशाच्या भविष्यासाठी गंभीर चिंतेचा विषय बनला आहे. शिक्षणाचा खर्च दरवर्षी सुमारे १० ते १२ टक्क्यांनी वाढत असल्याने सहा-सात वर्षांत तो जवळपास दुप्पट होतो. त्यामुळे गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळवणे सामान्य आणि मध्यमवर्गीय कुटुंबांच्या आवाक्याबाहेर जात आहे.**

ही केवळ आर्थिक नव्हे, तर सामाजिक न्याय आणि विकासाशी निगडित समस्या आहे. अलीकडेच संसदेच्या स्थायी समितीने शिक्षणावरील सार्वजनिक खर्च सकल देशांतर्गत उत्पन्नाच्या किमान सहा टक्क्यांपर्यंत वाढविण्याची शिफारस केली. मात्र २०२१-२२ मध्ये हा खर्च केवळ ४.१२ टक्के होता. राष्ट्रीय शिक्षण धोरणाने निश्चित केलेल्या उद्दिष्टापेक्षा हा आकडा कमी आहे. वाढती महागाई, विद्यार्थ्यांची वाढती संख्या आणि शिक्षणाचा दर्जा उंचावण्याची गरज लक्षात घेता सरकारने शिक्षण क्षेत्रातील गुंतवणूक वाढवणे अपरिहार्य आहे.

उच्च शिक्षणाच्या वाढत्या शुल्काचा सर्वाधिक फटका मध्यमवर्गीय, निम्न मध्यमवर्गीय आणि ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना बसत आहे. शिक्षण शुल्कासोबतच वसतिगृह, प्रवास, पुस्तके, स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण आणि इतर खर्चही वाढत आहेत. परिणामी अनेक विद्यार्थ्यांना शैक्षणिक कर्ज घ्यावे लागते, तर काहींना शिक्षण अर्धवट सोडण्याची वेळ येते. करिअरची सुरुवातच कर्जाच्या ओझ्याखाली होत असल्याने तरुणांवर आर्थिक ताण वाढतो.

भारतीय व्यवस्थापन संस्था, अहमदाबादचे उदाहरण या परिस्थितीचे तीव्र वास्तव दाखवते. २००७ ते २०२२ या काळात तेथील वार्षिक शुल्क चार लाख रुपयांवरून २७ लाख रुपयांपर्यंत पोहोचले. देशातील अनेक नामांकित संस्थांमध्ये शुल्क २५ लाख रुपयांपेक्षा अधिक झाले आहे. सरकारी संस्थांची ही अवस्था असेल, तर खासगी शिक्षणसंस्थांतील शुल्काचा सहज अंदाज येतो.

दुसरीकडे, आयआयटी, आयआयएम आणि केंद्रीय विद्यापीठांसारख्या दर्जेदार संस्थांची संख्या मर्यादित असल्याने अत्यल्प विद्यार्थ्यांनाच प्रवेश मिळतो. उर्वरित विद्यार्थ्यांना महागड्या खासगी संस्थांकडे वळावे लागते. यामुळे गुणवत्तापूर्ण शिक्षण आर्थिक क्षमतेवर अवलंबून राहते, ही स्थिती लोकशाही समाजासाठी धोकादायक आहे.

या परिस्थितीचा सर्वाधिक परिणाम मुलींच्या शिक्षणावर होतो. आर्थिक अडचणी आल्यास अनेक कुटुंबांमध्ये प्रथम मुलींच्या शिक्षणावरील खर्च कमी केला जातो. यामुळे शिक्षणातील लैंगिक विषमता अधिक वाढते. तसेच गरीब विद्यार्थ्यांना सहज शैक्षणिक कर्ज उपलब्ध होत नसल्याने त्यांच्यासाठी उच्च शिक्षणाची दारे आणखी अरुंद होतात.

उच्च शिक्षण ही खर्चाची बाब नसून देशाच्या मानवी भांडवलातील गुंतवणूक आहे. त्यामुळे सरकारी अनुदान वाढविणे, शुल्कवाढीवर नियंत्रण ठेवणे, शिष्यवृत्ती आणि सुलभ शैक्षणिक कर्जाचा विस्तार करणे तसेच अधिक दर्जेदार सार्वजनिक शिक्षणसंस्था उभारणे ही काळाची गरज आहे. अन्यथा आर्थिकदृष्ट्या दुर्बल पण गुणवंत विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहतील आणि सामाजिक विषमता आणखी तीव्र होईल. ज्ञानाधिष्ठित भारत घडवायचा असेल, तर उच्च शिक्षण सर्वांसाठी परवडणारे, गुणवत्तापूर्ण आणि सहज उपलब्ध करणे हाच विकासाचा खरा मार्ग आहे.

## प्रासंगिक »

### गर्विष्ठ मोर

**एक मोर होता. तो फार बढाईखोर होता. स्वतःच्या रूपाचा त्याला फार गर्व होता. तो दररोज नदीकिनारी जायचा. पाण्यात स्वतःचे प्रतिबिंब पाहून, स्वतःच्या सौंदर्याची स्तुती करायचा.**

मोर म्हणायचा, "माझा डोलदार पिसारा पहा! त्या पिसर्यावरील मोहक रंग पहा!! माझ्याकडे पहा! जगातील सर्वात सुंदर पक्षी मीच आहे.

एकेदिवशी मोराला नदीकिनाऱ्यावर एक करकोचा दिसला. मोराने त्याच्याकडे पाहून आपले तोंड फिरवले. आणि तुच्छतेने करकोच्याला म्हणाला, "किती रंगहीन आहेस तू! तुझे पंख पांढरे फटक आणि निस्तेज आहेत."

करकोचा म्हणाला, "मित्रा, तुझा पिसारा नक्कीच सुंदर आहे. माझे पंख तुझ्या सारखी सुंदर नाहीत. पण म्हणून काय झालं? तुझ्या पंखांनी तू उंच उडू शकत नाहीस. मी मात्र माझ्या पंखांनी आकाशात उंच उडू शकतो. "एवढे बोलून करकोचा ने आकाशात झेप घेतली. मोर मात्र खजील होऊन त्याच्याकडे पाहत राहिला.

- तात्पर्य :

दिखाऊ सौंदर्यापेक्षा उपयुक्तता महत्त्वाची असते.

अमेरिकेने पुन्हा एकदा आपल्या व्यापार धोरणात मोठा बदल करत अनेक देशांवरील आयातीवर अतिरिक्त सीमाशुल्क लागू केले आहे. या नव्या व्यवस्थेत भारतावर १० टक्के, तर अनेक स्पर्धक देशांवर १२.५ टक्के शुल्क लादण्यात आले आहे.

# दिलासा आणि कसोटी



त्यामुळे भारताला तुलनेने काहीसा दिलासा मिळाला असला, तरी हा निर्णय भारतीय निर्यात क्षेत्रासाठी एकाच वेळी संधी आणि आव्हान घेऊन आला आहे. अमेरिकेने १९७४ च्या व्यापार कायद्यातील कलम ३०१ अंतर्गत ही कारवाई केली आहे. जागतिक पुरवठा साखळीत शोषित श्रमाचा वापर रोखणे आणि नैतिक उत्पादन पद्धतींना प्रोत्साहन देणे, हे या निर्णयामागील अधिकृत कारण आहे. ज्या देशांनी कामगार हक्कांचे संरक्षण, पारदर्शक उत्पादन प्रक्रिया आणि नियंत्रण यंत्रणा उभारण्याबाबत सकारात्मक पावले उचलली आहेत, त्यांना कमी शुल्काच्या गटात स्थान देण्यात आले आहे. भारताचा या गटात समावेश होणे हे भारत-अमेरिका व्यापार संबंधांसाठी सकारात्मक संकेत मानले जात आहेत.

तथापि, १० टक्के अतिरिक्त शुल्कही भारतीय निर्यातदारांसाठी अडचणीचे ठरणार आहे. अमेरिका ही भारताची सर्वात मोठी निर्यात बाजारपेठ असल्याने वस्त्रोद्योग, तयार कपडे, रत्न-आभूषणे, कातडी वस्तू आणि पादत्राणे अशा श्रमप्रधान उद्योगांवर त्याचा थेट परिणाम होईल. आंतरराष्ट्रीय बाजारात आधीच तीव्र स्पर्धा आणि कमी नफ्याच्या वातावरणात अतिरिक्त शुल्कामुळे भारतीय उत्पादनांची किंमत वाढेल आणि काही क्षेत्रांतील स्पर्धात्मकता कमी होण्याची शक्यता आहे.

मात्र या निर्णयाची दुसरी बाजू भारतासाठी आशादायक आहे. भारताचे प्रमुख स्पर्धक असलेल्या काही देशांवर १२.५ टक्के शुल्क लागू झाल्याने भारतीय उत्पादने तुलनेने स्वस्त राहतील. मोठ्या प्रमाणावर आयात करणाऱ्या कंपन्यांसाठी हा २.५ टक्क्यांचा फरकही महत्त्वाचा ठरू शकतो. परिणामी काही उत्पादन क्षेत्रांमध्ये भारताला नवीन निर्यात संधी आणि अतिरिक्त ऑर्डर्स मिळण्याची शक्यता नाकारता येत नाही.

या निर्णयातून जागतिक व्यापाराचे बदलते स्वरूपही स्पष्ट होते. आता केवळ कमी किंमत किंवा उत्पादन क्षमता पुरेशी राहिलेली नाही. पुरवठा साखळीतील पारदर्शकता, कामगार हक्कांचे पालन आणि नैतिक उत्पादन मानके हीही जागतिक व्यापारातील महत्त्वाची निकष ठरत आहेत. त्यामुळे भारतीय उद्योगांनी आंतरराष्ट्रीय मानकांनुसार उत्पादन प्रक्रिया अधिक सक्षम करणे आणि पुरवठा साखळी अधिक विश्वासार्ह बनवणे आवश्यक आहे.

भारत सरकारसमोरही मोठी जबाबदारी आहे. अमेरिकेसोबत सुरू असलेल्या द्विपक्षीय व्यापार वाटाघाटींमध्ये भारतीय उद्योगांच्या हिताचे संरक्षण करणे, निर्यातदारांना आवश्यक धोरणात्मक पाठबळ देणे आणि जागतिक मानकांशी सुसंगत सुधारणा गतीने राबवणे गरजेचे आहे.

एकंदरीत, सर्वोच्च शुल्काचा फटका टळल्याने भारताला तात्पुरता दिलासा मिळाला आहे. मात्र १० टक्क्यांचे अतिरिक्त शुल्क हे भारतीय निर्यात क्षेत्राची कसोटी पाहणारे ठरणार आहे. या आव्हानाचे संधीत रूपांतर करण्यासाठी उद्योग, सरकार आणि निर्यातदार यांनी एकत्रितपणे काम केले, तर भारत जागतिक व्यापारात अधिक मजबूत स्थान निर्माण करू शकतो.

## ।। अभंगवाणी ।।



सदा माझे डोळे जडो तुझे मूर्ती ।
रखुमाईच्या पती सोयरिया ॥१॥

गोड तुझें रूप गोड तुझें नाम ।
देईं मज प्रेम सर्व काळ ॥ध्रु.॥

- संत तुकाराम

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# रत्नागिरीत बिबट्यांचा जीव धोक्यात!

## ११ वर्षांत ९० बिबट्यांचा मृत्यू, मानव-वन्यजीव संघर्ष तीव्र

**महाईन्यूज । रत्नागिरी**

**कोकणच्या निसर्गवैभवाचे प्रतीक असलेला बिबट्या आज स्वतःच्या अस्तित्वासाठी झुंज देत आहे. वाढता मानव-वन्यजीव संघर्ष, जंगलांची होणारी तोड, वाढते रस्ते जाळे आणि नैसर्गिक अधिवासावर होत असलेले अतिक्रमण यामुळे रत्नागिरी परिक्षेत्रातील बिबट्यांवर अभूतपूर्व संकट कोसळले आहे. २०१५ ते २०२५ या ११ वर्षांच्या कालावधीत तब्बल ९० बिबट्यांचा विविध कारणांनी मृत्यू झाला असून ही आकडेवारी वन्यजीव संवर्धनासाठी धोक्याची घंटा ठरत आहे. मात्र, या काळात वन विभागाने धाडसी आणि तत्पर बचावमोहीम राबवत ७५ बिबट्यांना मृत्यूच्या दाढेतून वाचवून पुन्हा त्यांच्या नैसर्गिक अधिवासात मुक्त केले आहे.**



> पशू पक्षी यांचे जतन करण्याची गरज आहे. जंगलाचा होत असलेला -हास आता प्राण्यांच्या जीवावर उठला आहे. त्यात मानव ही सहभागी आहे. मात्र, परिस्थिती गंभीर होण्याआधीच निसर्गाचा समतोल राखण्यासाठी सर्वांनीच मदत करणे गरजेचे आहे.
> **- संतोष मोरे, प्राणी मित्र, रत्नागिरी.**

वन विभागाकडील आकडेवारीनुसार, २२ बिबट्यांचा नैसर्गिक मृत्यू झाला आहे. तर रस्ते अपघात २१, उपासमारीमुळे १६, उघड्या विहिरीत पडून १४, जखमी होवून ७, शिकारीमध्ये २ तसेच इतर कारणांमुळे ८ बिबट्याचा मृत्यू झाला आहे. विशेषतः जंगलातून जाणाऱ्या महामार्गांवर वेगाने धावणारी वाहने आणि मानवी अतिक्रमणामुळे बिबट्यांचा जीव धोक्यात येत असल्याचे आता स्पष्ट झाले आहे.


२०२० हे वर्ष बिबट्यांसाठी सर्वाधिक काळे वर्ष ठरले. या एका वर्षातच १८ बिबट्यांचा मृत्यू झाला. दुसरीकडे, २०२४ मध्ये वन विभागाने विक्रमी १६ बिबट्यांची यशस्वी सुटका करत वन्यजीव संरक्षणातील आपली कार्यक्षमता सिद्ध केली. संकटात सापडलेल्या ७५ बिबट्यांपैकी तब्बल ४८ बिबटे उघड्या विहिरीत पडलेले, १८ बेकायदेशीर फासक्यांमध्ये अडकलेले, तर ९ इतर अडचणीत सापडलेले होते.जीवाची पर्वा न करता वन कर्मचाऱ्यांनी केलेल्या शर्थीच्या प्रयत्नांमुळे या सर्व बिबट्यांना सुरक्षितपणे बाहेर काढून पुन्हा जंगलात सोडण्यात आले.

वन्यजीव तज्ज्ञांच्या मते, उघड्या विहिरींना कठडे किंवा जाळ्या बसवणे, जंगलातून जाणाऱ्या रस्त्यांवर वेगमर्यादा आणि वन्यजीव अंडरपास उभारणे, तसेच बेकायदेशीर फासक्या लावणाऱ्यांवर कठोर कारवाई करणे ही काळाची गरज असल्याचे मत प्राणी प्रेमींनी व्यक्त केले आहे. बिबट्यांचे संरक्षण ही केवळ वन विभागाची जबाबदारी नाही, तर प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. निसर्गाचा समतोल राखायचा असेल, तर जंगल आणि वन्यजीवांचे संवर्धन हीच काळाची हाक आहे. अन्यथा, कोकणच्या जंगलातील बिबट्याची डरकाळी इतिहासजमा होण्याची भीती नाकारता येणार नाही.

# नीट परीक्षेत यश न मिळाल्याने विद्यार्थिनीची आत्महत्या

**महाईन्यूज । कर्जत**

**नीट परीक्षेमध्ये कमी गुण मिळाले म्हणून नैराश्य आलेल्या विद्यार्थिनीने आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना कर्जत तालुक्यातील जलालपूर येथे काल, शनिवारी सायंकाळी उघडकीस आली. अंकिता सुरेश सांगळे (वय १९, रा. जलालपूर, कर्जत) असे या आत्महत्या केलेल्या विद्यार्थिनीचे नाव आहे. तिच्याजवळ आढळलेल्या चिठ्ठीमध्ये नीट परीक्षेत कमी गुण मिळाल्याचा उल्लेख आहे.**



> अंकिता हिला डॉक्टर व्हायचे होते. ३ मे रोजी तिने नीट परीक्षा दिली होती. यामध्ये तिला चांगले गुण मिळाले होते, मात्र पेपर फुटल्यामुळे पुन्हा २१ जूनला परीक्षा घेण्यात आली. त्यामध्ये तिला १६६ गुण मिळाले. १७७ गुणांना 'कट ऑफ' होते. आपण पात्र ठरलो नाही, याची खंत तिला वाटत होती. त्यामुळे तिला नैराश्य निर्माण झाले होते.
> **- अण्णा सांगळे, अंकिताचे काका.**

अंकिताने नीटची फेरपरीक्षा दिली होती. त्यामध्ये आपण थोडक्यात कमी गुणाने पात्र ठरलो नाही अशी खंत तिला वाटत होती. त्याचे नैराश्य तिला आले होते, असे तिचे काका अण्णा सांगळे यांनी सांगितले तर आत्महत्या केलेल्या विद्यार्थिनीजवळ चिठ्ठी सापडली. याबाबत मृत्यूची नोंद करण्यात आली असून अधिक चौकशी सुरू असल्याचे पोलीस निरीक्षक हनुमान गायकवाड यांनी सांगितले.

अंकिताचे काका अण्णा सांगळे यांनी दिलेल्या माहितीनुसार अंकिताला नीट परीक्षेत १६६ गुण मिळाले होते, अपेक्षित गुण मिळाले नाही म्हणून ती मानसिक तणावाखाली होती. घटना घडली त्यावेळी तिचे वडील व भाऊ पंढरपूर येथे दर्शनासाठी गेले होते. घरामध्ये आई होती, परंतु ती कामांमध्ये व्यस्त होती. अंकिताला अभ्यासासाठी स्वतंत्र खोली देण्यात आलेली होती. त्यामध्ये बसून ती अभ्यास करत होती. बराच वेळ झाला तिचा काही आवाज किंवा हालचाल दिसली नाही, म्हणून आईने खोलीचा दरवाजा उघडून पाहिले तर समोरील दृश्य पाहून त्या घाबरून गेल्या.

त्यांनी तात्काळ शेजारी असलेल्या कुटुंबांना आवाज दिला. परिसरातील लोक धावत आले. त्यानंतर पोलिसांना माहिती देण्यात आली. पोलीस निरीक्षक हनुमान गायकवाड यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. त्यानंतर रुग्णालयामध्ये शवविच्छेदन करण्यात आले. या संदर्भात पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. रात्री उशिरा शोकाकुल वातावरणात अंकिता हिच्यावर जलालपूर येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

अंकिताने आत्महत्येपूर्वी लिहिलेल्या चिठ्ठीमध्ये म्हटले की, २१ जूनला झालेल्या नीट परीक्षेमध्ये तिला १६६ गुण मिळाले आणि कट ऑफ १७७ आहे. ही परीक्षा तिने अहिल्यानगर येथे असलेल्या केंद्रातून दिली होती. अपेक्षित यश या परीक्षेत मिळाले नाही त्यामुळे मला नैराश्य आले आहे. डॉक्टर होण्याची स्वप्न पूर्ण झाले नाही. या आत्महत्येसाठी माझे आई-वडील, भाऊ यापैकी कोणालाही जबाबदार धरू नये. असेही चिठ्ठीमध्ये म्हटले आहे.

# सिद्धरामय्या यांची मोठी घोषणा!

## विधानसभा न लढवण्याची केली घोषणा, काँग्रेसच्या गोटात खळबळ

**महाईन्यूज । कर्नाटक**

**कर्नाटकच्या राजकारणात मागील काही महिन्यांत मोठ्या घडामोडी घडल्या आहेत. सिद्धरामय्या यांनी कर्नाटकच्या मुख्यमंत्री पदाचा राजीनामा दिल्यानंतर डी.के.शिवकुमार यांनी मुख्यमंत्री पदाची सूत्रे हाती घेतली आहेत. मुख्यमंत्री पदाचा कार्यकाळ पूर्ण होण्याआधीच सिद्धरामय्या यांनी मुख्यमंत्री पदाचा राजीनामा दिला. मात्र, काँग्रेसने कर्नाटकात केलेल्या नेतृत्व बदलावरून अनेक तर्कवितर्क लावले जात आहेत. २०२८ च्या विधानसभेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कर्नाटकात नेतृत्व बदल करण्यात आल्याचं बोललं जातं.**



कर्नाटकच्या मुख्यमंत्री पदाचा राजीनामा दिल्यानंतर सिद्धरामय्या नाराज असल्याची चर्चा होती. त्यानंतर आता सिद्धरामय्या यांनी एक मोठी घोषणा केली आहे. 'राजकारण खूप भ्रष्ट झालं आहे', असं म्हणत आपण २०२८ ची विधानसभेची निवडणूक लढवणार नाही, अशी घोषणा सिद्धरामय्या यांनी केली. सिद्धरामय्या यांच्या या घोषणेमुळे काँग्रेसच्या गोटात आणि कर्नाटकच्या राजकारणात मोठी खळबळ उडाली आहे. या संदर्भातील वृत्त एएनआयने दिलं आहे.

"मी २०२८ ची विधानसभा निवडणूक लढवणार नाही. माझं वय आता ७९ वर्षे आहे. आमच्या सरकारचा कार्यकाळ संपायला अजून दीड वर्ष बाकी आहेत. तोपर्यंत माझं वय ८१-८२ वर्षे होईल. माझी प्रकृती पूर्वीसारखी ठणठणीत राहिलेली नाही. त्यामुळे आता पूर्वीसारख्या उत्साहाने काम करणं शक्य होत नाही", असं सिद्धरामय्या यांनी पोस्ट शेअर करत म्हटलं आहे.

दरम्यान, निवडणुकीतील आपल्या जुन्या प्रचार मोहिमांची आठवण सांगताना सिद्धरामय्या यांनी सांगितलं की, जेव्हा त्यांनी याआधी निवडणुका लढवल्या होत्या, तेव्हा मतदारसंघातील अनेक लोकांनी त्यांना आर्थिक मदत करत आपला विजय सुनिश्चित केला होता. पण आता परिस्थिती बदलली आहे. आजचं राजकारण पूर्णपणे भ्रष्ट झालं आहे. प्रामाणिक राजकारणाला आज काहीच स्थान उरलेलं नाही. त्यामुळे मी आता भविष्यात निवडणुका न लढवण्याचा निर्णय घेतला आहे", असंही सिद्धरामय्या म्हणाले आहेत. दरम्यान, सिद्धरामय्या यांच्या निवडणूक न लढवण्याच्या घोषणेवर काँग्रेस हायकमांडच्या काय प्रतिक्रिया येतात? ते पाहणंही महत्वाचं ठरणार आहे.

### 'राजकारण भ्रष्ट झालंय...'

"२०२८ ची विधानसभा निवडणूक किंवा भविष्यातील कोणतीही निवडणूक लढवणार नाही. मात्र, आपण सार्वजनिक जीवनात सक्रिय राहू आणि जनतेसाठी आवाज उठवणं सुरू ठेवू. आजचं राजकारण पूर्णपणे भ्रष्ट झालेलं आहे. त्यामुळे मी निवडणूक न लढवण्याचं ठरवलं आहे. पण राजकारणात सक्रिय राहून लोकांच्या सुख-दुखांचा आवाज बनून त्यांच्या पाठीशी उभा राहीन", असं सिद्धरामय्या यांनी म्हटलं आहे.

# तेज प्रताप यादव यांना १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी!

**महाईन्यूज । बिहार**

**नीट पेपरफुटीच्या निषेधार्थ पुकारलेल्या बिहार बंद आंदोलनादरम्यान झालेल्या हिंसाचाराप्रकरणी जनशक्ती जनता दल पक्षाचे अध्यक्ष तेज प्रताप यादव यांना पाटणा न्यायालयाने १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. रविवारी पहाटे पाटणा न्यायालयाने हा निर्णय दिला. तेज प्रताप आंदोलनाच्या समर्थनार्थ गांधी मैदानाजवळ राम गुलाम चौकात सहभागी झाले होते, यावेळी त्यांना पोलिसांनी ताब्यात घेतले होते.**





तेज प्रताप यादव नौबतपूर पोलीस ठाण्यात होते. यानंतर त्यांना न्यायदंडाधिकाऱ्यांसमोर हजर करण्यात आले. कोठडीच्या आदेशानंतर त्यांना बियूर मध्यवर्ती कारागृहात हलवण्यात आले. तेज प्रताप यादव यांच्या सुटकेसाठी सोमवारी नियमित जामीन अर्ज दाखल केला जाईल, असे त्यांचे वकील जगन्नाथ सिंह यांनी सांगितल्याचे इंडियन एक्सप्रेसच्या वृत्तात म्हटले आहे. नीट पेपरफुटी प्रकरणी शनिवारच्या बिहार बंद आंदोलनाला गांधी मैदान परिसरात हिंसक वळण लागले. आंदोलनादरम्यान दगडफेक, तोडफोड आणि पोलिसांसोबत चकमकीच्या घटना उघडकीस आल्या.

या हिंसक आंदोलनानंतर पोलिसांनी गुन्हा दाखल केला होता. गांधी मैदान पोलीस ठाण्यात याप्रकरणी गुन्हा नोंद करण्यात आला आहे. एफआयआरनुसार तेज प्रताप यादव यांच्याविरोधात दंगल घडवणे, पोलिसांवर हल्ला करणे, पोलिसांच्या वाहनाचे नुकसान करणे, शासकीय कर्मचाऱ्यांना कर्तव्य पार पाडण्यापासून रोखणे आणि पोलीस अधिकाऱ्याला दुखापत करणे यासारखे गंभीर आरोप ठेवण्यात आले आहेत. दरम्यान, यादव यांच्याविरोधात हत्येचा प्रयत्न केल्याप्रकरणी भारतीय न्याय संहितेच्या कलम १०९ चा देखील एफआयआरमध्ये समावेश असल्याचे वकील सिंह म्हणाले.

### दोनदा ताब्यात घेतल्यानंतर अटक

तेज प्रताप यादव माजी मुख्यमंत्री लालू प्रसाद आणि राबडी देवी यांचे ज्येष्ठ पुत्र आहेत. नीट पेपरफुटीच्या निषेधार्थ पुकारलेल्या बिहार बंद आंदोलनात गांधी मैदानाजवळ राम गुलाम चौकात यादव सहभागी झाले होते. आंदोलनस्थळावरुन यादव यांना ताब्यात घेण्यात आले. काही तासांनी त्यांची सुटका करण्यात आली मात्र, पुन्हा पाटण्याच्या सिटी सेंटर मॉलमध्ये पोलिसांनी त्यांना ताब्यात घेऊन अटक केली.



# विद्या बालनचा मराठमोळा अंदाज

बॉलिवूड अभिनेत्री विद्या बालन सोशल मीडियावर तिच्या हटके आणि मनोरंजक व्हिडिओंमुळे नेहमीच चर्चेत असते. विशेष म्हणजे, मराठी भाषा आणि संस्कृतीबद्दल असलेले तिचे प्रेम अनेकदा तिच्या सोशल मीडिया पोस्टमधून दिसून येते. मराठी गाणी, संवाद आणि विनोदी स्किट्सवर ती वेळोवेळी रील्स तयार करत असते. आता पुन्हा एकदा विद्याने मराठी गाण्यावर लिपसिंग करत तयार केलेला व्हिडिओ सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल झाला असून, चाहत्यांसह मराठी कलाकारांकडूनही त्याचे भरभरून कौतुक होत आहे. काही महिन्यांपूर्वी विद्याने लोकप्रिय मराठी विनोदी कार्यक्रम **‘महाराष्ट्राची हास्यजत्रा’**मधील एका गाजलेल्या स्किटवर रील तयार केला होता. त्या व्हिडिओला सोशल मीडियावर लाखो व्ह्यूज मिळाले होते आणि मराठी प्रेक्षकांनी तिच्या सहज अभिनयाचे कौतुक केले होते. त्यानंतर आता तिने पुन्हा एकदा मराठी गाण्याची निवड करत चाहत्यांना आनंदाचा धक्का दिला आहे. -यावेळी विद्याने ‘एकटा जीव सदाशिव’ या मराठी चित्रपटातील गाजलेल्या ‘काल रातीला सपान पडलं’ या गाण्यावर लिपसिंग रील तयार केला आहे. या व्हिडिओमध्ये तिने गुलाबी रंगाचा आकर्षक ड्रेस परिधान केला असून, गाण्याच्या प्रत्येक ओळीला साजेशी हावभाव आणि अभिव्यक्ती सादर केली आहे. तिचा हा सहज आणि मोहक अंदाज चाहत्यांच्या विशेष पसंतीस उतरला आहे. सोशल मीडियावर हा व्हिडिओ मोठ्या प्रमाणात शेअर केला जात असून, अनेकांनी तिच्या मराठी उच्चारांचे आणि मराठी संस्कृतीबद्दलच्या प्रेमाचे कौतुक केले आहे. या रीलवर अनेक मराठी कलाकारांनीही प्रतिक्रिया देत विद्याचे अभिनंदन केले आहे. "मराठी गाण्यांवर तुझा अंदाज खूपच सुंदर आहे", "मराठीवरचं तुझं प्रेम मन जिंकणारं आहे", अशा अनेक सकारात्मक प्रतिक्रिया चाहत्यांनी कमेंट्समधून दिल्या आहेत. विद्या बालनने बॉलिवूडमध्ये आपल्या दमदार अभिनयाच्या जोरावर वेगळी ओळख निर्माण केली आहे. ‘परिणीता’, ‘लगे रहो मुन्नाभाई’, ‘भूल भुलैया’, ‘भूल भुलैया ३’, ‘कहानी’, ‘द डर्टी पिक्चर’ यांसारख्या अनेक यशस्वी चित्रपटांमधून तिने प्रेक्षकांची मने जिंकली आहेत. तिच्या उत्कृष्ट अभिनयासाठी तिला अनेक प्रतिष्ठित पुरस्कारांनीही गौरविण्यात आले आहे.



# गिरीजा प्रभूच्या नव्या फोटोंची सोशल मीडियावर चर्चा

छोट्या पडद्यावरील लोकप्रिय अभिनेत्री गिरीजा प्रभू हिने आपल्या अभिनयासोबतच आकर्षक आणि पारंपरिक फॅशन सेन्समुळेही प्रेक्षकांच्या मनात वेगळे स्थान निर्माण केले आहे. सध्या तिचे काही नवे फोटो सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत असून चाहत्यांकडून त्यांना भरभरून प्रतिसाद मिळत आहे. या फोटोंमध्ये गिरीजाचा पारंपरिक आणि देखणा अंदाज विशेष लक्ष वेधून घेत आहे. या नव्या फोटोशूटमध्ये गिरीजाने गुलाबी रंगाची सुंदर महेश्वरी साडी परिधान केली आहे. साधेपणा, पारंपरिकता आणि देखणेपणाचा उत्तम संगम असलेली ही साडी तिच्या सौंदर्यात आणखी भर घालत आहे. साडीला साजेशी केशरचना, हलका मेकअप आणि आत्मविश्वासपूर्ण हावभाव यामुळे तिचा संपूर्ण लूक अधिकच खुलून दिसत आहे. गिरीजाच्या या पारंपरिक अवतारावर चाहत्यांनी सोशल मीडियावर कौतुकाचा वर्षाव केला असून अनेकांनी तिच्या सौंदर्याची आणि स्टाइलची प्रशंसा केली आहे. महेश्वरी साडी ही भारतातील सर्वाधिक प्रसिद्ध आणि लोकप्रिय पारंपरिक साड्यांपैकी एक मानली जाते. मध्य प्रदेशातील ऐतिहासिक माहेश्वर शहरात या साड्यांचे उत्पादन केले जाते. सूक्ष्म विणकाम, आकर्षक काठ, हलके वजन आणि रेशीम-कापसाच्या उत्कृष्ट मिश्रणामुळे महेश्वरी साड्यांना देशभरात विशेष मागणी आहे. पारंपरिक वारसा आणि आधुनिक फॅशन यांचा सुंदर मेळ या साड्यांमध्ये पाहायला मिळतो. त्यामुळे विविध समारंभ, सण आणि विशेष प्रसंगी महिलांची पहिली पसंती महेश्वरी साडीला दिली जाते. आपल्या या पारंपरिक लूकला अधिक उठावदार बनवण्यासाठी गिरीजाने नक्षीदार दागिन्यांची निवड केली आहे. गळ्यातील हार, कानातील झुमके आणि हातातील दागिने तिच्या साडीशी अतिशय सुंदर जुळून आले आहेत. दागिन्यांसोबतचा तिचा साधा आणि मोहक मेकअप चाहत्यांना विशेष भावला असून अनेकांनी तिच्या फोटोंवर प्रेमाचा वर्षाव केला आहे. अभिनयाच्या आघाडीवरही गिरीजा प्रभू सातत्याने यशस्वी वाटचाल करत आहे.

# 'वैभव सूर्यवंशी'ने रचला इतिहास

## आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये १५व्या वर्षी 'ही' कामगिरी करणारा जगातला पहिलाच फलंदाज

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**भारत आणि झिम्बाब्वे यांच्यात पार पडलेल्या तिसऱ्या टी-२० सामन्यात भारताचा युवा फलंदाज वैभव सूर्यवंशी याने इतिहास रचला आहे. अवघ्या १५ व्या वर्षी आंतरराष्ट्रीय क्रिकेटच्या कोणत्याही प्रकारात दोन अर्धशतके झळकावणारा तो जगभरातील पहिला फलंदाज ठरला असून, त्याने स्वतःच्या नावावर आणखी एका जागतिक विक्रमाची नोंद केली आहे. यापूर्वी क्रिकेट जगतात एकाही फलंदाजाला अशी कामगिरी करता आलेली नाही.**




रविवारी, २६ जुलै रोजी पार पडलेल्या या लढतीत सूर्यवंशीने ३१ चेंडूंत आपले अर्धशतक पूर्ण केले. या मालिकेतील पहिल्याच सामन्यातही त्याने धडाकेबाज अर्धशतक ठोकून टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये वयाच्या १५ व्या वर्षी अर्धशतक करणारा पहिला खेळाडू होण्याचा मान मिळवला होता. याआधी एकदिवसीय आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये नेपाळच्या कुशल मल्ला याने वयाच्या १५ व्या वर्षी अर्धशतक झळकावले होते. मात्र, त्याच्या नावावर या वयात केवळ एकच अर्धशतक आहे. सूर्यवंशीने मात्र दोन अर्धशतके पूर्ण करत या विक्रमाला आपल्या नावे केले आहे. क्रिकेटच्या शेकडो वर्षांच्या इतिहासात १५ व्या वर्षी अशी किमया करणारा तो एकमेव फलंदाज बनला आहे.

झिम्बाब्वेविरुद्धच्या या तिसऱ्या सामन्यात वैभवने ४९ चेंडूंत ८१ धावांची धडाकेबाज खेळी साकारली. या खेळीदरम्यान त्याने ८ चौकार आणि ४ उत्तुंग षटकार मारले. सहसा २०० हून अधिकच्या स्ट्राईक रेटने फलंदाजी करणाऱ्या वैभवने या सामन्यात खेळपट्टीचा अंदाज घेत अत्यंत संयमी फलंदाजी केली आणि १६५.३५ च्या स्ट्राईक रेटने धावा जमवल्या.

अखेर वेस्ली मधेवेरेच्या चेंडूवर ब्रॅड इवांसने त्याचा झेल टिपला. पहिल्या सामन्यात अवघ्या १९ चेंडूंत अर्धशतक झळकावणाऱ्या वैभवकडून या सामन्यात शतकाची अपेक्षा केली जात होती. अवघ्या १५ वर्षे १२१ दिवस वयाचा असलेला वैभव जर शतक झळकावण्यात यशस्वी ठरला असता, तर टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये सर्वात तरुण वयात शतक ठोकण्याचा विक्रमही त्याच्या नावावर झाला असता.

शतकाची ही संधी हुकली असली, तरी त्याच्या या ८१ धावांच्या खेळीने संघाला मजबूत स्थितीत पोहोचवले. भारतीय संघाने ही मालिका आधीच २-० अशी जिंकली असून, झिम्बाब्वेला क्लीन स्विप देण्याच्या इराद्याने संघ मैदानात उतरला आहे.

### लहान वयात मोठ्या विक्रमांची मालिका

वैभव सूर्यवंशीने २३ जुलै रोजी हरारे येथे झिम्बाब्वेविरुद्ध खेळताना अवघ्या १५ वर्षे ११८ दिवस वयात पहिले आंतरराष्ट्रीय अर्धशतक झळकावले होते. अवघ्या १८ चेंडूंत ठोकलेल्या या अर्धशतकामुळे तो पुरुषांच्या आंतरराष्ट्रीय क्रिकेटच्या सर्व प्रकारांत सर्वात कमी वयात अर्धशतक करणारा खेळाडू बनला होता. त्यानंतर लागोपाठ दुसरे अर्धशतक ठोकत त्याने आपल्या कौशल्याची छाप पुन्हा एकदा जगावर पाडली आहे.

# ग्लासगोत ऋषिकांत सिंहची रौप्यपदकाला गवसणी; भारताला दुसरे पदक

**महाईन्यूज । ग्लासगो**

**भारताचा युवा वेटलिफ्टर ऋषिकांत सिंह चननबाम याने राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा २०२६ मध्ये रविवारी चमकदार कामगिरी करत पुरुषांच्या ६० किलो वजनी गटात रौप्यपदकावर आपले नाव कोरले. राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेच्या या आवृत्तीतील भारताचे हे दुसरे पदक ठरले आहे. आपल्या पदार्पणाच्या राष्ट्रकुल स्पर्धेत ऋषिकांतने एकूण २६४ किलो (स्नॅच १२१ किलो + क्लीन अँड जर्क १४३ किलो) वजन उचलून ही कौतुकास्पद कामगिरी केली.**



अत्यंत रोमांचक ठरलेल्या या स्पर्धेत सुवर्णपदकाची शर्यत अंतिम क्षणापर्यंत रंगली होती. ऋषिकांतने सुवर्णपदकावरील दावा मजबूत करण्यासाठी शेवटच्या प्रयत्नात १५१ किलो वजन उचलण्याचा प्रयत्न केला, मात्र क्लीन अँड जर्क प्रकारात त्याला यश मिळू शकले नाही. या संधीचा पुरेपूर फायदा घेत मलेशियाच्या अनिक कासदानने एकूण २७३ किलो (१२१ + १५२ किलो) वजन उचलत नवीन क्रीडा विक्रमासह (गेम्स रेकॉर्ड) सुवर्णपदक पटकावले. केन्याच्या जोशुआ मबोयाने २५५ किलो वजन उचलून कांस्यपदकावर कब्जा केला, तर श्रीलंकेचा पी. एस. सोमाथिलाका १५२ किलोचा अंतिम प्रयत्न अपयशी ठरल्याने चौथ्या स्थानावर राहिला.


मणिपूरमधील इम्फाळ वेस्ट येथील रहिवासी असलेल्या ऋषिकांत सिंहने भारतीय सैन्याच्या (इंडियन आर्मी) स्पोर्ट्स सेटअपमध्ये आपले कठोर प्रशिक्षण पूर्ण केले आहे. सध्या तो भारताच्या सर्वात विश्वासार्ह आणि आघाडीच्या हलक्या वजनी गटातील लिफ्टर्सपैकी एक म्हणून ओळखला जातो.

ऋषिकांतने यापूर्वी बर्मिंगहॅम येथे झालेल्या २०२२ च्या राष्ट्रकुल स्पर्धेत ५५ किलो वजनी गटातून पदार्पण केले होते. त्यानंतर त्याने आपल्या वजनी गटात सुधारणा करत ग्लासगो २०२६ मध्ये ६० किलो गटात एक सक्षम दावेदार म्हणून पुनरागमन केले.

### कोण आहे ऋषिकांत सिंह?

मणिपूरमधील इम्फाळ वेस्ट येथील रहिवासी असलेल्या ऋषिकांत सिंहने भारतीय सैन्याच्या स्पोर्ट्स सेटअपमध्ये आपले कठोर प्रशिक्षण पूर्ण केले आहे. सध्या तो भारताच्या सर्वात विश्वासार्ह आणि आघाडीच्या हलक्या वजनी गटातील लिफ्टर्सपैकी एक म्हणून ओळखला जातो.


D Y PATIL
INTERNATIONAL
UNIVERSITY
AKURDI PUNE
Think | Thrive | Transform
IMAGINE.
DESIGN.
TRANSFORM.
Shape Tomorrow.
B. DESIGN
WHERE CREATIVITY MEETS PURPOSE.
A future-focused program that nurtures creativity, builds design thinking and empowers you to create meaningful design solutions for a better tomorrow.
CREATIVE EXPLORATION
Unleash ideas and build strong visual thinking.
DESIGN THINKING
Solve real problems and create impactful solutions.
EXPLORE & EXPERIMENT
Work across multiple disciplines and design with purpose.
CAREERS WITHOUT LIMITS
From UI/UX to Product, Interior to Communication and more.
ADMISSIONS OPEN 2026
APPLY NOW!
SCAN TO KNOW MORE
GOOD DESIGN CREATES A BETTER WORLD.



# पवना धरण ९७% भरले!

## नदीपात्रात विसर्ग वाढवला; ७,५०० क्युसेकने पाणी सोडण्यास सुरुवात

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पवना धरणातील पाणीसाठा ९७ टक्क्यांवर पोहोचल्याने धरणातून नदीपात्रात सोडण्यात येणाऱ्या पाण्याच्या विसर्गात वाढ करण्यात येणार असल्याची माहिती पवना धरण प्रकल्प प्रशासनाने दिली आहे. सध्या आज रविवार (दि.२६) १२ वाजता पवना नदीपात्रात ५,५०० क्युसेक पाण्याचा विसर्ग सुरू असून तो वाढवून ७,५०० क्युसेक करण्यात येणार आहे.**

धरणाच्या पाणलोट क्षेत्रात तसेच घाटमाथ्यावर सुरू असलेल्या पावसामुळे धरणात येणाऱ्या पाण्याचे प्रमाण वाढत आहे. त्यामुळे धरणाची पाणीपातळी नियंत्रित ठेवण्यासाठी विसर्गात टप्प्याटप्प्याने वाढ केली जाणार असून, परिस्थितीनुसार तो ९,००० क्युसेकपर्यंत वाढविण्याची शक्यता प्रशासनाने व्यक्त केली आहे.

सततच्या पावसामुळे नदी, नाले आणि ओढ्यांमधील पाणीपातळी अचानक वाढू शकते. तसेच पवना नदीच्या सखल भागांमध्ये पूरस्थिती निर्माण होण्याची शक्यता असल्याने नदीकाठच्या गावांतील नागरिक, शेतकरी आणि लाभधारकांना सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.


नदीपात्रातील शेती अवजारे, कृषी पंप, जनावरे तसेच इतर साहित्य तातडीने सुरक्षित ठिकाणी हलविण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवता प्रशासनाकडून वेळोवेळी देण्यात येणाऱ्या सूचनांचे पालन करावे, असे आवाहन पवना धरण प्रकल्पाच्या पूर नियंत्रण कक्षाकडून करण्यात आले आहे.

पवना नदीकाठच्या परिसरातील नागरिकांनी खबरदारी घेण्यासह आवश्यक असल्यास सुरक्षित ठिकाणी स्थलांतरासाठी तयारी ठेवावी, असेही प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

# पिंपरी-चिंचवड शहरामध्ये कचरा व्यवस्थापनाला नवा वेग

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड शहरातील दहा क्षेत्रीय कार्यालयात प्रत्येकी एक कचरा प्रक्रिया केंद्र असे एकूण दहा केंद्र पिंपरी-चिंचवड महापालिकेकडून सुरू करण्यात येणार आहेत. त्यासाठी पिंपरी-चिंचवड शहरातील ४० जागांचा शोध क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी घेतला आहे. त्यातून योग्य जागा निश्चित केल्या जाणार आहेत.**



मोशी कचरा डेपोतील वेस्ट टू एनर्जी प्रकल्पातील अनधिकृत प्रशासकीय इमारत कोसळून ९ कर्मचाऱ्यांचा नाहक बळी गेला. तर, काही कर्मचारी जखमी झाले. त्या दुर्घटनेपासून तेथे कचरा वाहनांची वाहतूक बंद झाली आहे. सतरा दिवस उलटूनही डेपो बंद असल्याने शहरात कचराकोंडी निर्माण झाली आहे. शहरात सर्वत्र कचऱ्याचे ढीग दृष्टीस पडत आहेत.

मोशी कचरा डेपोवरील ताण कमी करण्यासाठी आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी महापालिकेच्या सर्व दहा क्षेत्रीय कार्यालय क्षेत्रात अत्याधुनिक कचरा प्रक्रिया केंद्र तीन महिन्यात सुरू करण्याची ग्वाही १५ जुलैच्या सर्वसाधारण सभेत दिली होती. त्यासाठी ठोस तसेच, प्रसंगी कठोर भूमिका घेणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले होते.

आयुक्तांच्या सूचनेनुसार अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम यांनी सर्व दहा क्षेत्रीय अधिकारी व कार्यकारी अभियंत्यांची बैठक घेऊन त्यांना तात्काळ जागा शोधण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार, प्रत्येक क्षेत्रीय कार्यालय क्षेत्रात सरासरी चार जागा शोधण्यात आल्या आहेत. एकूण ४० जागांचा शोध पूर्ण करण्यात आला आहे. त्या ठिकाणी घरगुती ओला कचऱ्यापासून बायो-सीएनजी निर्मिती, प्लास्टिक बाटल्यापासून कच्चा माल तयार करणे, सुका कचऱ्यापासून पुर्ननिर्माण असे प्रकल्प सुरू करण्यात येणार आहेत. शहरात एकूण ४० जागांचा शोध घेण्यात आला आहे. जागेचे क्षेत्र आणि लोकवस्ती अशी यादी तयार करण्यात आली आहे. अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारित बायो-सीएनजी प्रकल्प, प्लास्टिक बाटल्यांपासून कच्चा माल तयार करणे, सुका कचरा प्रक्रिया केंद्र व इतर प्रकल्प उभारले जाणार आहेत.

### सल्लागार नियुक्तीसाठी महापालिकेकडून निविदा प्रक्रिया

शहरात दहा ठिकाणी अत्याधुनिक पद्धतीचे बायो-सीएनजी केंद्र तसेच, इतर कचरा प्रकल्प सुरू करण्यासाठी सल्लागार नियुक्तीची निविदा महापालिकेच्या आरोग्य विभागाने शनिवार (दि. २५) प्रसिद्ध केली आहे. दहा वर्षांसाठी सल्लागार नेमला जाणार आहे. घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पांचे नियोजन व व्यवस्थापन करणे,डीपीआर तयार करणे, निविदाप्रक्रिया राबवणे, देखरेख व दस्तऐवजीकरण करणे, महापालिकेच्या कचरा व्यवस्थापनासाठी आवश्यक तांत्रिक व व्यवस्थाकीय सहाय्य घेणे आदी कामे सल्लागारांला करावी लागणार आहेत. त्यासाठी पात्र एजन्सींकडून ३१ जुलैपर्यंत प्रस्ताव मागवण्यात आले आहेत.

# सिग्नलवर नियम पाळणाऱ्यांनाच त्रास!

## पिंपरी-चिंचवडमध्ये हॉर्नबाजी आणि दादागिरीचा वाढता प्रकार; नागरिक त्रस्त

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**शहरातील प्रमुख चौकांमध्ये वाहतूक नियमांचे पालन करणाऱ्या वाहनचालकांनाच आता मानसिक त्रास सहन करावा लागत असल्याचे चित्र आहे. सिग्नल लागल्यानंतर तेथे थांबवणाऱ्या वाहनचालकांना मागून येणाऱ्या काही वाहनचालक सतत हॉर्न वाजवणे, हातवारे करणे, ओरडणे आणि पुढे जाण्यासाठी दबाव टाकणे असे प्रकार सर्रास घडत आहेत. त्यामुळे वाहतूक नियम पाळणारा चालकच अडथळा, अशी मानसिकता सर्रास बळावत असल्याचे चित्र शहरात दिसून येत आहे.**



सिग्नलवर थांबणे हा वाहतुकीचा मूलभूत नियम आहे. मात्र, शहरात आता नियम पाळणाऱ्यांनाच कर्कश्श हॉर्न वाजवणे तसेच शिवीगाळ करून वाहतूक नियम मोडण्यास उद्युक्त केले जाते. काही वाहनचालकांची ही वाढती मुजोरी वेळेत न रोखल्यास शिस्तीबरोबरच नागरिकांची सुरक्षितताही धोक्यात येण्याची भीती व्यक्त होत आहे.

लाल दिवा लागल्यानंतर समोरची वाहने थांबलेली असतानाही मागून कर्कश हॉर्नचा मारा सुरू होतो. काहीजण वाहन अगदी जवळ आणून पुढे जाण्याचा प्रयत्न करतात, तर काही चालक हातवारे करत किंवा शिवीगाळ करत नियम पाळणाऱ्यांवरच दबाव आणतात. एवढेच नव्हे, तर काहीजण सिग्नलचे उल्लंघन करून पुढे निघून जातात.

या प्रकारामुळे वाहतूक शिस्तीला तडा जात असून, अपघाताचा धोका वाढत आहे. विशेषतः चौकातून उजवीकडे किंवा डावीकडे वळणाऱ्या वाहनांसाठी ही घाई जीवघेणी ठरू शकते. काही सेकंदांच्या उतावळेपणामुळे मोठे अपघात होण्याची शक्यता वाहतूक तज्ज्ञांकडून व्यक्त केली जात आहे. सततचा हॉर्न, आक्रमक हावभाव आणि दबावामुळे महिला तसेच ज्येष्ठ नागरिक अधिक अस्वस्थ होतात.

> सिग्नल तोडणे आणि विनाकारण हॉर्न वाजवणे हे दोन्ही प्रकार दंडनीय आहेत. अनावश्यक हॉर्न वाजविल्यास ५०० रुपये, तसेच सिग्नल तोडल्यास ५०० रुपयांचा दंड आहे. पुन्हा नियमभंग केल्यास वाढीव दंड आकारला जातो. मॉडिफाय केलेले प्रेशर हॉर्न लावणाऱ्या वाहनांवरही कारवाई करत आहोत. आम्ही सीसीटीव्हीच्या माध्यमातूनही कारवाई करत आहोत.
>
> **- अमित डोळस, वरिष्ठ वाहतूक पोलिस निरीक्षक.**

### हॉर्नचा इशारा नव्हे, दबावाचे हत्यार

वाहनाचा हॉर्न हा केवळ इशारा देण्यासाठी असतो. मात्र, शहरातील अनेक चौकांमध्ये त्याचा वापर पुढील वाहनचालकावर मानसिक दबाव टाकण्यासाठी होत असल्याचे दिसते. लाल सिग्नल असतानाही सतत हॉर्न वाजवून समोरील चालकाला गाडी पुढे घेण्यास भाग पाडण्याचा प्रयत्न केला जातो. त्यामुळे अनेक चालक गोंधळून नियमभंग करतात.

## लोणावळा पूरप्रकरण तापले; भरपाईच्या मागणीसाठी नगर परिषद आक्रमक

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**लोणावळा शहरात जुलै महिन्याच्या पहिल्या आठवड्यात सहा जुलै रोजी भयंकर पूरपरिस्थिती निर्माण होत 1900 कुटुंब यामध्ये बाधित झाली आहेत. टाटा कंपनीच्या मान्सून लेकमधून मोठ्या प्रमाणात शहरात पाणी आल्यामुळे अनेक नागरी वस्त्यांमध्ये पाच ते दहा फुटांपर्यंत पाणी साचले गेले. यामध्ये नागरिकांचे अतोनात हाल झाले. घरातील सर्व साहित्य पाण्यात वाहून गेले, नादुरुस्त झाले.**



### टाटा विरोधात जनहित याचिका

पूरपरिस्थितीमुळे नागरिकांचे कधीही भरून न येणारे असे अतोनात नुकसान झाले आहे. या संकट समयी टाटा कंपनीने लोणावळा शहरातील नागरिकांच्या सोबत उभे राहणे गरजेचे असताना त्यांनी मदत करण्यास अप्रत्यक्षपणे नकार दिला आहे, असे नगरसेवकांनी या आढावा बैठकीमध्ये नागरिकांना सांगितले. याकरिता टाटा कंपनीच्या विरोधात आवाज उठवत या नुकसानीची भरपाई टाटा कंपनीने द्यावी या मागणीसाठी सदरचा धडक मोर्चा काढण्यात येणार असल्याचे या वेळेस सांगण्यात आले. तसेच टाटा कंपनीच्या विरोधात न्यायालयामध्ये जनहित याचिका दाखल करण्याबाबत देखील चर्चा झाली.

या सर्व परिस्थितीला टाटा कंपनीचे चुकीचे धोरण कारणीभूत असल्याचा ठपका लोणावळा नगर परिषदेने ठेवला आहे. टाटा कंपनीने मान्य करूनदेखील भरपाई देण्यास टाळाटाळ केली जात असल्याने मंगळवारी (दि. २८) टाटा कंपनीविरोधात मोर्चा काढण्यात येणार आहे.

टाटा कंपनीसोबत आमदार सुनील शेळके यांची नुकसान भरपाईबाबत चर्चा झाली, त्यानंतर जिल्हाधिकारी कार्यालय या ठिकाणीदेखील चर्चा झाली. मात्र, टाटा कंपनी कोणत्याही प्रकारे लोणावळ्यातील पूरग्रस्त नागरिकांना मदत करण्यास तयार नसल्याचे नगरसेवक निखिल कवीश्वर यांनी लोणावळा शहरातील सर्वपक्षीय व नागरिकांच्या संयुक्त बैठकीत सांगितले. टाटा कंपनी आपली जबाबदारी झटकत असल्याने या विरोधात आवाज उठवत संपूर्ण लोणावळा शहराच्या वतीने टाटा कंपनीच्या विरोधात 28 जुलै रोजी धडक मोर्चा काढण्याचा निर्णय या लोणावळा नगर परिषदेने घेतला आहे. या मोर्चाबाबतचे नियोजन व नागरिकांची मते जाणून घेण्यासाठी लोणावळा नगर परिषदेमध्ये शनिवारी 25 जुलै रोजी एका सर्वपक्षीय बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

लोणावळा शहरात पाच व सहा जुलै रोजी मुसळधार पाऊस झाला. या पावसामुळे टाटा कंपनीचे मान्सून धरण पूर्णपणे भरले. हे धरण भरल्यानंतर त्यामधील पाणी डक्ट लाईनच्या माध्यमातून खोपोली भागात सोडले जाते. यंदा मात्र टाटा कंपनीने हे पाणी डक्ट लाईनमधून सोडले नाही. त्यामुळे धरणाच्या सांडव्यावरून पाणी लोणावळा शहरामध्ये येऊ लागले. जोरदार पडणारा पाऊस व त्यामध्येच धरणांमधून मोठ्या प्रमाणात शहरात आलेले पाणी यामुळे अवघ्या दोन ते तीन तासांमध्ये नागरी वस्त्यांमध्ये पाच ते दहा फुटापर्यंत पाणी साचले गेले. रस्टिक हायलंड या ठिकाणी दरड कोसळल्याने मोठ्या प्रमाणात माती व राडारोडा डक्ट लाईनमध्ये आल्यामुळे पाणी अडले गेले असे कारण टाटा कंपनीने दिले आहे. मात्र, अशी परिस्थिती निर्माण होणार नाही याकरता टाटा कंपनीने उपाययोजना करणे गरजेचे होते, अशा भावना नगर परिषदेने व नागरिकांनी व्यक्त केल्या आहेत. या बैठकीला लोणावळा नगर परिषदेचे नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष, मुख्याधिकारी व सर्व नगरसेवक तसेच लोणावळा शहरातील राजकीय पक्षांचे अध्यक्ष, व्यापारी व पूरग्रस्तबाधित नागरिक उपस्थित होते.

# A Complete Guide to Maharashtra's Modern Powerhouse



**Located just northwest of Pune, Pimpri-Chinchwad has evolved far beyond its traditional identity as a quiet satellite town. Today, it stands proud as one of India's fastest-growing urban hubs and a monumental driver of Maharashtra's economic engine. Originally established as a dedicated manufacturing zone by the Maharashtra Industrial Development Corporation (MIDC) in the 1960s, the twin city has earned global recognition as the powerhouse "Automobile Hub of India." It acts as the production base for automotive heavyweights like Tata Motors, Mahindra, and Mercedes-Benz.**

Supported by thousands of thriving small and medium-scale engineering enterprises, the city has seamlessly expanded its industrial horizons into precision engineering, pharmaceuticals, and next-generation information technology corridors.

What truly transforms Pimpri-Chinchwad into a model smart city today is its focus on forward-thinking public welfare projects and large-scale civic initiatives executed by the Pimpri-Chinchwad Municipal Corporation (PCMC). To tackle growing traffic demands and ensure eco-friendly, seamless connectivity for its rising population, the city has successfully integrated modern mass transit. A major highlight is the active Pune Metro Purple Line, which offers high-speed transit across the region. To support expanding residential zones, massive civil works are actively underway on the metro extension project, stretching the high-speed rail corridor directly from Pimpri up to Nigdi.

Pimpri-Chinchwad Municipal Corporation (PCMC) is actively taking to transform the twin city into a modern, highly livable smart city.

Priyadarshani SCHOOL & JR. COLLEGE

**The main initiatives highlighted are:**

High-Speed Public Transit (Metro & Beyond)

Advanced Civic Infrastructure (Moshi Multi-Specialty Hospital,Civil court,COEP Technological University campus, IIM Nagpur extension Campus etc )

Citizen-First Participatory Governance,

Smart City Integration & Environmental Rejuvenation

Pimpri-Chinchwad is no longer just a shadow or a satellite to Pune; it is a masterclass in modern Indian urbanization. By successfully anchoring its massive industrial wealth with public-first welfare initiatives, smart civic infrastructure, and expanding green transit networks, the twin city has cemented its reputation as a premier live-work destination. As it continues to expand its metro lines and healthcare systems, Pimpri-Chinchwad stands as a brilliant blueprint for how a city can grow rapidly without losing its commitment to its citizens.

Dhanashri Chaudhari
Grade X (Ionian)
Priyadarshani School
Moshi

# Social Media Addiction Hurting Students' Academic Focus

**MahaEnews I PIMPRI-CHINCHWAD**

**The growing obsession with likes, shares, and subscribers on social media platforms is increasingly influencing children and teenagers, raising serious concerns among parents, teachers, and mental health experts about its long-term impact on education and well-being.**



With smartphones becoming easily accessible, many students are spending hours scrolling through Instagram, YouTube, and other social media platforms. Instead of focusing on academics, an increasing number of youngsters are dreaming of becoming content creators and gaining instant online fame through reels and viral videos.

Teachers from several schools have observed a noticeable decline in students' concentration during classroom sessions. Discussions about trending social media content often dominate conversations, while homework, reading habits, and outdoor activities are gradually taking a back seat.

The desire to gain more views, followers, and online recognition has also pushed some youngsters to create videos in risky and unsafe locations, putting their safety at serious risk.

Experts warn that measuring self-worth through the number of likes and followers can negatively affect children's confidence. When posts fail to receive the expected response, many youngsters experience disappointment, anxiety, and constant comparisons with others on social media.

Mental health professionals believe that completely banning social media is not the solution. Instead, children should be taught responsible and balanced digital habits with proper guidance from parents and teachers.